अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील नवीन खाजगी संस्थांतील औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या शैक्षणिक संस्थांना मान्यता देण्याबाबत....

**महाराष्ट्र शासन**

उच्च व तंत्रशिक्षण विभाग

शासन निर्णय क्र. टिईएम- २००६/(३२९/०६)/तांशि-१,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२

दिनांक ३० जून, २००६

संदर्भ :- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिरषद, नवी दिल्ली यांची दि. २९.०६.२००६ चे फॅक्स द्वारा पत्र

__शासन निर्णय__ :- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधिन पत्रान्वये सन २००६-०७ या शैक्षणिक वर्षात औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रमाच्या खाली नमूद केलेल्या नवीन शैक्षणिक संस्थेस ६० प्रवेशक्षमतेत औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी परवानगी दिलेली आहे. त्यास अनुसरून याबाबत शासन आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १. | जामिया ईस्लामीया ईशा-अतुल उल्म चे अलि-अलाना कॉलेज ऑफ फॉमसी, मोलगी रोड, मु.पो. अकलकुआ, ता. अकलकुआ, जि. नंदुरबार - ४२५ ४१५ | बी.फार्मसी | ६० |
| २. | मुंबई एज्यूकेशन ट्रस्टचे इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी, भुजबळ नॉलेज सीटी, अडगाव, नाशिक | बी.फार्मसी | ६० |
| ३. | महाराष्ट्र एज्यूकेशन सोसायटीचे एच.के. कॉलेज ऑफ फार्मसी, एच.के. बिल्डींग, प्रतिक्षा नगर, म्युनसिपल शाळेजवळ, ओशिवरा, जोगेश्वरी, मुंबई - ४०० १०२ | बी.फार्मसी | ६० |
| ४. | रवी बहु- उद्देशीय शैक्षणिक संस्थेचे सोनेकर कॉलेज ऑफ फॉर्मसी, देवी रोड, कोराडी, महादुला, नागपूर | बी.फार्मसी | ६० |
| ५. | श्री. धनेश्वरी मानव विकास मंडळाचे डॉ. वेद प्रकाश पाटील फार्मसी कॉलेज, गेवराई, तावडा, पैठण रोड, औरगांबाद | बी.फार्मसी | ६० |
| ६. | श्री. विठठल इन्स्टिटयूटचे स्वैरिश कॉलेज ऑफ फार्मसी पंढरपूर, | बी.फार्मसी | ६० |

ARKhale

PRINCIPAL

H K COLLEGE OF PHARMACY

Jogeshwari (W), Mumbai-400 102

State Approval GR

२. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेची सदरहू वरीलप्रमाणेची मान्यता विचारात घेऊन शासनाकडून या शासन निर्णयान्वये उपरोक्त संस्थांना सन २००६-०७ औषधनिर्माणशास्त्र पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास खालील अटी व शर्तीवर मान्यता देण्यात येत आहे.

१)प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दि. २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटीची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्राची आणि औपचारिक बाबींची पूर्तता तंत्रशिक्षण संचालकाच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमासाठीच्या संलग्नीकरणासाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ मधील तरतूदीनुसार संबंधित विद्यापीठाची मान्यता / संलग्नीकरण घेणे आवश्यकँ आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक, तंत्रशिक्षण यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयांने / संस्थेने त्यांच्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष पूर्ण होण्यापूर्वी फार्मसी ॲक्ट १९४८ च्या कलम १२ मधील तरतूदीनुसार फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांची विहित मान्यता प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहिल.

६) सदर पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार / पध्दतीनुसार करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( स्मिता द. निवतकर )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१ संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई
३. मा. कुलसचिव, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर
४. मा. कुलसचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
५. मा. कुलसचिव, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
६. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
७. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
८. निवड नस्ती (तांशि-१)

प्रत –

१. सल्लागार (यू.जी.) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी खेल परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११० ००२.
२. विभागीय अधिकारी, पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इनशुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई ४०० ०२०.

ARKhale

PRINCIPAL
...COLLEGE OF PHARMACY